**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक :- २४/०९/२०१८

**घोटी-सिन्नर महामार्गावर लुटमार करणारे दरोडेखोर जेरबंद - स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कामगिरी**

---

दिनांक १६ सप्टेंबर २०१८ रोजी रात्रीचे सुमारास ठाणे शहरातील रहिवासी श्री. संजित तुकाराम शेवाळे हे त्यांचे पत्नीसह त्यांचेकडील स्कोडा कारने सिन्नर - घोटी मार्गे ठाणे शहराकडे जात असतांना घोटी परिसरातील देवळे शिवारात अज्ञात चोरटयांनी बिगर नंबरची सिल्व्हर रंगाची स्विफ्ट डिझायर कार श्री. संजित शेवाळे यांचे गाडीला आडवी लावुन त्यांचे तोंडावर तिखट स्प्रे मारून गाडीचे पाठीमागील सिटवर ठेवलेली पैशांची बॅग व कागदपत्रे असा एकुण २ लाख ५० हजार रूपयाचा ऐवज जबरीने दरोडा टाकुन घेवुन गेले होते. सदर बाबत **घोटी पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. १२०/२०१८ भादवि कलम ३९५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी दखल घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकास तात्काळ घटनास्थळी पाचारण केले व फिर्यादी श्री. संजित शेवाळे यांचेकडेस घडले प्रकाराबाबत विचारपुस केली, तसेच सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा कसोशिने शोध घेणेसाठी स्थागुशाचे तपास पथकास सुचना दिल्या. सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हा करणारे आरोपी हे जिल्हयाचे सीमावर्ती भागातील असल्याचा तर्क लावुन, स्थागुशाचे तपास पथकास लगतचे जिल्हयात पाचारण केले. दिनांक २३ सप्टेंबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी असे अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सिमावर्ती भागात वरील गुन्हयाचा समांतर तपास करत असतांना, खब-यामार्फत मिळालेल्या गुप्त बातमीचे आधारे स्थागुशाचे पथकाने घोटी टोलनाका परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) अरूण विठ्ठल बांगर, वय ३२, रा. मोहाचापाडा, भिवंडी,** जि.ठाणे यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले आरोपीस विश्वासात घेवुन सखोल चौकशी केली असता, त्याने त्याचे **नाशिक शहर व संगमनेर येथील साथीदारांसह वरील गुन्हा केल्याची कबुली** दिली. त्यानुसार सदर गुन्हयाचे समांतर तपासात स्थागुशाचे पथकाने शिर्डी तसेच सिन्नर तालुक्यात रात्रभर सापळा रचुन संशयीत नामे **२) विजय तबाजी काळे,** वय ३६, रा. घारगाव बाजाजरतळ हल्ली मालदड रोड, त्रिमुर्ती चौक संगमनेर, जि.अ.नगर, **३) विकास उर्फ विकी तानाजी चव्हाणके,** वय २३, रा. शिवडे, ता.सिन्नर, जि.नाशिक, **४) अमोल रामनाथ माळी,** वय २६, रा. शिवडे, ता.सिन्नर अशांना ताब्यात घेतले. सदर आरोपीतांनी मिळुन त्यांचा साथीदार **५) सुमित अविनाश निरभवणे,** रा. देवळाली, नाशिकरोड व त्याचे इतर ०३ साथीदारांसह यातील फिर्यादी श्री.संजित शेवाळे यांचे स्कोडा कारवर पाळत ठेवुन घोटी परिसरातील देवळे गावचे शिवारात त्यांची गाडी आडवुन लुटमार केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपीतांचे कब्जातुन **गुन्हयात वापरलेली सिल्व्हर रंगाची स्विफ्ट डिझायर कार क्र. एम.एच. ०२.बी.जे.५३७१** कि.रू. २ लाख हे वाहन जप्त करण्यात आले असुन गुन्हयाचे पुढील तपासकामी सर्व आरोपीतांना घोटी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे. यातील आरोपी अरूण बांगर याचेविरूध्द ठाणे शहरात फसवणुकीचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील नाशिक शहर व अहमदनगर जिल्हयातील निष्पन्न आरोपीतांवर अशा प्रकारचे अजुन काही गुन्हे दाखल असल्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोउनि स्वप्निल नाईक,** सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा बंडु ठाकरे, शिवाजी जुंदरे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, संदिप लगड, योगेश गुमलाडू यांचे पथकाने सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन वरील गुन्हा उघडकीस आणलेला आहे.